# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

०८ जुलै,२०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7447744100 (PRO)

# स्थानिक गुन्हे शाखेची अवैध दारू तस्करांविरूध्द कार्यवाही १० लक्ष रूपये किंमतीचा मुदद्ेमाल हस्तगत

दिनांक ०८/०७/२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक चंद्रपुर शहर पोलीस स्टेशन परिसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, अंचलेश्वर वार्ड परिसरात एक महिन्द्रा कंपनीची पिकअप गाडी मध्ये दारु लपवुन ठेवण्यात आलेली आहे. अशा माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्या ठिकाणी सापळा रचुन छापा टाकला असता मिळालेल्या माहितीप्रमाणे एक महीन्द्रा पिकअप गाडी दिसुन आली. सदर ठिकाणी गाडीचा चालक दिसुन आला नाही. गाडीमध्ये प्लॉस्टीकचे कॅरेट व त्यामध्ये दारु असल्याचा संशय असल्याने पथकाने सदर वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये दारु दिसु नये या करिता भाजीपाला ठेवण्यात येणारे ७० रिकामे प्लॉस्टीक कॅरेट व त्या मधोमध पोत्यांमध्ये ९० एमएल नी भरलेल्या २८०० बॉटल देशी दारु किमंत ३,०१,०००/—रु चा मुद्येमाल मिळुन आला. सदर दारूचा माल व वाहन एमएच २८ बीबी २८१० किं. ७,००,०००/—रू असा एकुण १०,०१,०००/—रू चा मुदद्ेमाल जप्त करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथे नोंद करण्यात आला असुन आरोपीचा शोध सुरु आहे.

सदरची कामगिरी गुन्हयाचा पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरिक्षक श्री. ओ.जी. कोकाटे यांचे नेतृत्वात पोउपनि. सचिन गदादे, सफौ. पदमाकर भोयर, पोना. प्रकाश बल्की, अमजद खॉन, पोशि. सतिश बघमारे, मिलींद जांभुळे, नितीन रायपुरे यांनी पार पाडली.

———————————————————————————————————————